# <u>नियमीत दिवाणी दावा क्र.126/2016 मधील निशाणी 18 खालील आदेश</u>

1. प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांनी सदरच्या अर्जाद्वारे अशी विनंती केली आहे की प्रतिवादींना कैफियत व जबाब दाखल करणेस झालेला विलंब माफ व्हावा व कैफियत तसेच जबाब दाखल करून घेणेचा हुकुम व्हावा.

2. प्रतिवादींनी त्यांच्या अर्जात असे म्हंटले आहे की कैफियत दाखल करणे कामी आवश्यक व महत्वाचे कागदपत्र मिळविण्यास तसेच सदर कागदपत्रे वकीलांना देण्यास उशिर झाला. त्यामुळे प्रतिवादी समन्स बजावल्यानंतर 30 दिवसांच्या आंत सदर कैफियत दाखल करू शकले नाही. प्रतिवादीचा मुद्यामहून कैफियत उशिराने दाखल करणेचा उद्येश नव्हता त्यामुळे कैफियत दाखल करून घेणे गरजेचे आहे.

3. उलटपक्षी वादीच्या वकीलांनी अर्ज कायदेशीर नाही, नमूद केलेले कारण योग्य नाही असे म्हणणे मांडून अर्ज खर्चासह रद्द होणेची विनंती केली आहे.

4. सदर खटल्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रतिवादींना समन्सची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र. 1 ते 4 दिनांक 30.09.2016 रोजी वकीलांसह हजर झाले. परंतू त्यानंतरही प्रतिवादी कैफियत दाखल करू शकले नाही.

5. सदरचा दावा अतिक्रमीत जागेचा कब्जा मिळणेबाबत आहे. त्यामुळे दाव्याचे अवलोकन करता दावा कायदेशीरपणे चालवून निकाली निघण्यासाठी, प्रतिवादींना दाव्याचा प्रतिकार करण्यासाठी कैफियत तसेच जबाब दाखल करण्याची संधी देणे योग्य होईल असे मला वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

-: **<u>आदेश</u>** :-

प्रतिवादी क्र.1 ते 4 यांचा अर्ज 100/- रूपयेच्या खर्चासह मंजूर करण्यात येतो व कैफियत स्विकारण्यात येते.

( सुधीर न. शिंदे )

दिनांक :12.01.2017

सह दिवाणी न्यायाधीश, क-स्तर, येवला